# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ५५/१०, ५६-१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्री. सुरेश अनंतरराव म्हेत्रे (तक्रार क्र. ५५/२०१०)<br>मु.पो. विटा, ता. खानापूर, जि. सांगली<br>२) सौं. कमल सुधाकर म्हेत्रे (तक्रार क्र. ५६/२०१०)<br>मु.पो. विटा, ता. खानापूर, जि. सांगली | अर्जदार |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, विटा, जि. सांगली | विरुध्द पक्षकार |

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय क्र. २, विटा, जि. सांगली

**कोरम** :-१) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य-सचिव
३ श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## संयुक्त न्याय निर्णय

श्री. जी.सी. लेले, सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. सुरेश अनंतराव म्हेत्रे व सौं. कमल सुधाकर म्हेत्रे हे दोन्ही पॉवरलूमसाठी वीज वापर करणारे मु.पो. विटा येथील ग्राहक आहेत. उभयतांची मुख्य मागणी यंत्रमाग संजीवनीचा लाभ मिळावा व पोकळ बाकीवर लावलेले दंड व व्याज माफ करावे असे स्वरुप आहे. त्यासाठी दोघांनी अंतर्गत कक्ष, सांगली यांच्याकडे अर्ज केला.

कक्षाने दिलेला निर्णय मान्य न झाल्याने मंचामध्ये दि. २.३.२०१० रोजी अर्ज दाखल केला. मंचाने अर्ज दाखल करुन घेवून पुढील कार्यवाही चालू केली व दि. १९.४.२०१० रोजी मंच कार्यालयात सुनावणीची तारीख निश्चित केली. सुनावणीच्यावेळी ग्राहक प्रतिनिधी श्री. जावेद मोमीन व ग्राहक तसेच वि.प.चे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुळ तक्रार अर्ज, त्यासोबतची कागदपत्रे तसेच वि.प.ची तक्रारी संदर्भात भूमिका, हजर केलेली कागदपत्रे, अंतर्गत कक्ष, सांगली या सर्वांचा एकत्रित विचार केल्यावर ग्राहकाच्या तक्रारीचे व मागणीचे सर्व सर्वसाधारण स्वरुप तसेच वि.प.ची भूमिका व कार्यवाही पुढील प्रमाणे दिसून येते.

<u>ग्राहकाची तक्रार व मागणीचे सर्वसाधारण स्वरुप</u>

वरील दोन्हीही ग्राहक हे अनुक्रमे दि. १.४.१९८४ व दि. १८.८.१९९४ पासूनचे ७ एचपी व ५ एचपी चे पॉवरलूमसाठी वीज वापरणारे ग्राहक आहेत. शासनाच्या धोरणानुसार २००४ च्या थकबाकीवर ५०% सूट देणारी यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ मिळाला नाही, वि.पने भरणा करण्यासाठी योग्य बिले दिली नाहीत, त्यात रक्कम किती भरावयाची याचा उल्लेख नाही, त्यास वि.प. जबाबदार आहे. म्हणून अंतर्गत कक्षात ग्राहकाने तक्रार केलेली आहे. अंतर्गत कक्षाचा निर्णय मान्य न झाल्याने मंचात तक्रार दाखल केली आहे. नियमानुसार देय रक्कम भरण्यास तयार असल्याचे ग्राहकाने नमूद केले आहे. तसेच चालूची बिले भरत असल्याचे सांगितले.

<u>वि.प.ची भूमिका व कार्यवाही</u>

अंतर्गत कक्षाचा आदेश बरोबर आहे. वरील दोन्ही ग्रहकांची मार्च २००४ च्या थकबाकीपैंकी ५०% रक्कम व एप्रिल २००४ ते मार्च २००५ या काळातील वीज बिल चुकते करणे आवश्यक होते. त्यांनी ५०% रक्कम भरणा व वीज बिलाची पूर्ण रक्कम न भरल्याने यंत्रमाग संजीवनीचा लाभ देता येणार नाही. तसेच सदरचे ग्राहक स्वच्छ हाताने मंचापुढे आलेले नाहीत. संबंधित विषयासाठी ते दिवाणी न्यायाधिश कनिष्ठस्तर ,विटा यांच्यापुढे रे.हि.मु.नं. ४१/२००७ ग्राहकाने दावा दाखल केला होता. तसेच आपआपसात (वि.प. व अर्जदार) तडजोड झाल्याचे मा. कोर्टापुढे चुकीचे कथन केल्याबद्दल मुद्दा उपस्थित केला आहे. प्रस्तुतचा अर्ज खोटा,द्वेषपूर्वक व साधक चुकीचा असेलेने पुरेशा कारणाशिवाय फेटाळण्यात यावा असे प्रतिवादन केले आहे.

अंतर्गत कक्ष, सांगली यांनीही ग्राहकाची मागणी फेटाळली आहे.

सर्व कागदपत्रे, सुनावणीच्यावेळची कथने व सादर म्हणणे या अनुषंगाने मंचासमोर खालील मुद्दे निष्कर्षासाठी उद्‌भवतात.

मुद्दा क्र. १ : दोन्हीही ग्राहक यंत्रमाग संजीवनीचा लाभ मिळण्यास पात्र आहेत काय ?

उत्तर : होय. संजीवनी योजनेचा लाभ मिळणे आवश्यक आहे.

मुद्दा क्र २ : ग्राहकाने मा. दिवणी न्यायाधिश कनिष्ठस्तर वि यांच्यापुढील दाखल केलेल्या अर्जाचा विचार करणे योग्य आहेत काय ?

उत्तर : नाही. सदरचा अर्ज ग्राहकाने काढून घेतला आहे.

मुद्दा क्र. ३ : आदेश ?

उत्तर : अंतिम आदेशा प्रमाणे

वरील मुद्दयांच्या आधारे कारणमिमांसा करणे योग्य आहे असे मंचाचे मत झाले आहे.

<u>कारणमिमांसा</u>

वरील दोन्ही ग्राहकांनी प्रतिनिधी श्री. जावेद मोमीन यांच्यामार्फत तक्रार दाखल केलेली आहे. महाराष्ट्र शासनाने यंत्रमाग धंदयाच्या संरक्षणासाठी यंत्रमाग संजीवनी योजना जाहीर केली. सदर योजने अंतर्गत २००४ च्या बाकीपैंकी ५०% रक्कम ग्राहकाने एप्रिल २००४ ते मार्च २००५ या कालावधीत चालू बिलासोबत भरणेची आहे. सदरची ५०% रक्कमही तीन हप्त्याने भरण्यास परवानगी दिली होती, तसेच मार्च २००५ पर्यंतचे चालू बिलही भरणे सक्तीचे होते.

प्रस्तुत प्रकरणी अनुक्रमे (१) रु. ५९,१०९.१३ व (२)रु. ४१५०६.०० या मुळ २००४ च्या थकबाकीपैंकी ५०% म्हणजे (१) रु. २९५५४.९२ (२) २०७५३.२१ इतकी रक्कम भरणे आवश्यक होते. सदरची रक्कम मार्च २००५ अखेर भरल्यावर उर्वरीत ५०% रकमेची सबसिडी मिळणार होती. परंतु या बाबतीत सर्व हिशोब करुन चालू बिलाबरोबर भरणा करावयाचा तपशिल रकमेसह कळविला नसल्याचे दिसून येते. श्री. सुरेश म्हेत्रे यांनी सादर केलेल्या विज बिल नक्कलेतून ' नोव्हेंबर २००४ अखेर संजीवनी ' असास उल्लेख करुन चालू बिलाबरोबर रु. २५८२५/– इतक्या रकमेची नोंद दिसून येते. सदरचे बिल ग्राहकाने २८ मार्च २००५ लाभरलेले आहे. सदरचे बिल हाताने केलेले आहे. मार्च २००५ पूर्वी नेमकी किती रक्कम ग्राहकाने जमा करावयाची आहे हे वि.प.कडून कळविलेले दिसत नाही. तसचे सौं.कमल म्हेत्रे यांनाही दिलेल्या बिलात वरील प्रमाणे उल्लेख आहे. बिलावर प्रत्यक्षात रु. १८७०१/– चा उल्लेख आहे. प्रत्यक्षात ग्राहकाने २९ मार्च २००५ रोजी रु. १६७०१/– व परत त्याचदिवशी दुसऱ्या बिलाने रु.२०००/– जमा केले आहेत. सदरची सर्व बिले हातानी बनविलेली आहेत.

सदर योजने अंतर्गत एप्रिल २००० च्या बाकीपासून मार्च २००४ पर्यंतचा सर्व हिशोब नव्याने करुन ग्राहकास तसे समजावून सांगून मार्च २००५ पर्यंत भरणा करावयाची रक्कम वि.प.ने कळवावयाची होती तसे घडले नसल्याचे दिसून येते. त्यामुळे सर्व बाजूंनी विचार करुन १ल्या मुद्दयाचे उत्तर ' होय ' असे नोंदवावे लागले आहे. त्यामुळे उभयतां दोन्हीही ग्राहकांना अनुक्रमे रु. २९,५५४.९२ व रु.२०७५३.२५ इतक्या रकमेचा लाभ द्यावा असे मंचाचे स्पष्ट मत आहे. त्यामुळे वरील रकमेचा द्यावयाचा लाभ गृहीत धरुन आजमितीस द्यावयाची रक्कम ग्राहकास समजावून सांगावी तसे लेखी कळवावे.

सदर हिशोब वेळच्यावेळी होणे आवश्यक होते, तसे न झाल्याने पोकळ थकबाकी व त्यावरील व्याज यामुळे ग्राहकांकडून येणे बाकी जास्त दिसून लागल्याने वीज पुरवठा खंडीत केला हि बाब गंभार आहे. अशा घटना घडू नयेत याची दक्षता वि.प.ने घेणे जरुरीचे आहे. वीज वापरावर आधारीत योग्य बिले देणे व नंतर वसुली करणे यावर सर्व व्यवस्था अवलंबून आहे. तथापी हिशोबाच्या नोंदीबाबत व्यवस्थापन दक्ष नसल्याचे दिसून येते. सदरच्या ग्राहकांनी यपूर्वी ग्राहक तक्रार निवारण मंचाची व्यवस्था याबद्दल माहिती नसल्याने मा. कनिष्ठस्तर न्यायालय, विटा यांच्यासमोर तक्रार केलेली होती. त्यावेळी मंचापुढे अर्ज केल्यावर वि.प.ने सदरील मुद्दा मंचाच्या निदर्शनास आणून दिल्याने विनियमातील तरतुदीच्या आधारे सदरचा अर्ज चालविणेस अपात्र केला होता. सदर मा. न्यायालयाने वीज प्रवाह खंडीत करु नये असा निर्णय दिला. मुळ दावा चालणेचा होता. त्या दरम्यान ग्राहक मंचाचे कार्यप्रणालीची कल्पना आल्याने ग्राहकांनी सदरचा कोर्टापुढील मुळ अर्ज काढून घेतला आहे. त्यामुळे कोणताही न्यायनिर्णय सदर न्यायालयाने केलेला नाही. त्यामुळे सर्व कागद पडताळणी करुन सदरचे तक्रारी अर्ज दाखल करुन घेतले आहेत.

त्यामध्ये ग्राहकांनी मंचाची कोणतीही दिशाभूल केलेली नाही. त्याचप्रमाणे वि.प.ने काल मर्यादा (Limitation) मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्याचाही विचार मंचाने केलेला आहे. मंचासमोर वि.प.तर्फे हजर केलेले कागद, अंतर्गत कक्षाचा निर्णय या बाबी विचारांत घेतल्या आहेत.

सबब सर्व कागदपत्रे, दाखल म्हणणे या आधारे मंच खालील आदेश पारीत करीत आहे.

१) श्री. सुरेश अनंतराव म्हेतर यांनी खालील प्रमाणे भरणा केलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| मार्च २००४ ची येणे रक्कम | .. | रु. २९,५५४.९२ |
| एप्रिल २००४ ते मार्च २००५ वीज वापर बिल | .. | रु. १०,११२.३० |
| एकूण | .. | रु. ३९,६६७.२२ थकबाकी |
| पैंकी जमा रक्कम (एप्रिल २००४ ते मार्च २००५ काळात वेळोवेळी जमा केलेली रक्कम) | .. | रु. ३४,७५४.०० |
| | | रु. ०४,९१३.२२ |

रु. ४९१३.२२ इतकी रक्कम मार्च २००५ अखेरची श्री. सुरेश म्हेत्रे यांनी भरणे आवश्यक आहे. सदरील रकमेचा हिशोब करतांना रु २९५५४.९२ इतक्या रकमेचा यंत्रमाग संजीवनीचा लाभ देतांना विचार केलेला आहे. वि.प.ने वेळीच योग्य हिशोब दिलेला नाही. त्यामुळे वरील सुरेश म्हेत्रे यांच्याकडून रु.४९१३.२२ इतकी रक्कम वसूलपात्र आहे. त्यामुळे मार्च २००४ च्या थकबाकी रकमेवर लागले गेलेले व्याज व दंड वसूलपात्र नाहीत

२) <u>सौं. कमल म्हेत्रे</u>

| | | |
|---|---|---|
| मार्च २००४ ची येणे रक्कम | .. | रु. २०,७५३.२५ |
| एप्रिल २००४ ते मार्च २००५ वीज वापर बिल | .. | रु. ९,५१३.९० |
| एकूण | .. | रु. ३०,२६७.१५ थकबाकी |
| पैंकी जमा रक्कम (एप्रिल २००४ ते मार्च २००५ काळात वेळोवेळी जमा केलेली रक्कम) | .. | रु. २६,७७७.०० |
| | | रु. ०३,४९०.१५ |

रु. ३,४९०.१५ इतकी रक्कम मार्च २००५ अखेर सौं. कमल म्हेत्रे यांनी भरणे आवश्यक आहे. सदरील हिशोब करतांना रु. २०,७५३.२५ इतकी रक्कम म्हणजे थकबाकीच्या ५०% रक्कम यंत्रमाग संजीवनी लाभासाठी गृहित धरली आहे. वि.प.ने वेळीच योग्य हिशोब सांगून पैंसे जमा करणेविषयी कळविणे आवश्यक होते, तसे न झाल्याने ग्राहकास योजनेचा लाभ दिलेला आहे.

दोन्हीही ग्राहकांच्या अनुक्रमे (१) रु. ४९१३.२२ व (२) रु ३,४९०.१५ इतकी रक्कम मार्च २००५ अखेर देय निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानंतर वि.प.ने अदा केलेली बिले ग्राहकांनी भरावयाची आहेत. त्यामध्ये कसूर झाली असल्यास वि.प.ने प्रचलित नियमानुसार कार्यवाही करावी. वर उल्लेख केलेली रक्कम ग्राहकाने तक्रार अर्जात नमूद केल्याप्रमाणे एकरकमी भरणेची आहे. त्यामुळे वरील रक्कम थकबाकी गृहित धरुन त्याप्रमाणे पुढील हिशोब वि.प.ने मांडावा.

## आदेश

१) ग्राहकांचा यंत्रमाग संजीवनी लाभ योजने संदर्भातील अर्ज मंजूर केलेला आहे. त्यामुळे अनुक्रमे देय रक्कम (१) रु. ४९१३.२२ सुरेश म्हेत्रे व (२) रु ३,४९०.१५ सौं. कमल म्हेत्रे यांनी एकरकमी भरणा करणेची आहे.

२) वरील रकमा मार्च २००५ अखेरची निश्चित समजून पुढील येणे– देणे संदर्भात वि.प.ने ग्राहकाच्या खात्याचा हिशोब मांडून ग्राहकास कळविणेचा आहे.

३) सदर रकमेवर व्याज अगर दंड लावणेचा नाही.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक :

( जी. सी. लेले )
सदस्य

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष :

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष